अखिल भारतीय समन्वयीत औषधी व सुगंधी आणि पानवेली संशोधन प्रकल्प,
नागार्जुन वनौषधी उद्यान डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला, ४४४ १०४ (महाराष्ट्र)
e mail - nmpgpdkv@gmail.com

जा.क्र./अ.भा.स.सं.प्र./ना.व.उ/रो.वा./२०१/२०२६ दि. १५/०६/२०२६

# निविदा सूचना

**विषय**:- नागार्जुन वनौषधी उद्यान डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला येथील वनौषधी रोपवाटीकेमध्ये व प्रक्षेत्रावरील शेती निगडीत विविध कामाकरिता कंत्राटी मजूर पुरविणे व ट्रॅक्टर /बैलजोडी द्वारे कामे करणे बाबत.

अखिल भारतीय समन्वयीत औषधी व सुगंधी आणि पानवेली संशोधन प्रकल्प, नागार्जुन वनौषधी उद्यान डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला येथे सन २०२६-२७ करिता वनौषधी रोपवाटीकेमध्ये, संशोधनात्मक प्रयोगामध्ये व प्रक्षेत्रावरील दैनंदिन विविध कामाकरिता स्त्री/पुरुष कंत्राटी मजूर खाजगी तत्वावर लावण्याकरिता, ट्रॅक्टर /बैलजोडी द्वारे कामे करण्याकरिता बंद लिफाफ्या मध्ये खाली स्वाक्षरी कलेल्या पत्त्यावर दिनांक २५/०६/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविण्याबाबत खुल्या बाजारपेठेमधून दर मागविण्याचे प्रस्तावित आहे. करिता खाली दिलेल्या प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | | करावयाची कामे/कामाचा तपशील | दर रु. प्रति हे. | शेरा |
|---|---|---|---|---|
| अ) | ट्रॅक्टर द्वारे करावयाची कामे | | | |
| | १. | दोन फाळी नांगरणी | | |
| | २. | तीन फाळी नांगरणी | | |
| | ३. | फंटावाही | | |
| | ४. | पंजीवाही | | |
| | ५. | पट्टापास | | |
| | ६. | रोटावेटर | | |
| | ७. | सरी पाडणे | | |
| | ८. | ट्रक्टरने पेरणी | | |
| | ९. | ट्रॅक्टर ट्रॉलीने वाहतूक करणे - विभागावरून काढणी केलेले पिक, बेणे, बियाणे, इंधन, कुटार इ. भांडारगृहात ठेवणे; झाडांच्या कुंड्या वाहून नेणे; कापलेले गवत, निलगिरी पाला भट्टीपर्यंत वाहून आणणे. (वाहन, वाहन चालक, इंधन व मजूरसह) | | |
| | १०. | ट्रॅक्टरसह टँकरने पाणी पुरवणे | | |
| ब) | बैलजोडी द्वारे करावयाची कामे | | | |
| | ११. | बैलजोडीने पेरणी करणे | | |
| | १२. | पिकात हल्ली चालवणे बैल जोडीसह | | |
| | १३. | वखरणी करणे बैल जोडीसह | | |
| | १४. | डवरणी करणे बैल जोडीसह (३०से.मी.,४५से.मी.,६०से.मी.,१२०से.मी.) | | |
| | १५. | काकर पाडणे बैल जोडीसह | | |
| | १६. | चौफुली पाडणे बैल जोडीसह | | |

| अ.क्र. | | करावयाची कामे/कामाचा तपशील | दर रु. प्रति हे. | शेरा |
|---|---|---|---|---|
| क) | | **अकुशल मजुरांकडून (हंगामी) करावयाची कामे** | | |
| | १७ | काशा/काडी-कचरा वेचणे | | |
| | १८ | शेणखत पसरवणे | | |
| | १९ | पेरणी/लागवड करणे | | |
| | २० | निंदन करणे | | |
| | २१ | फवारणी करणे | | |
| | २२ | पिकाची कापणी/काढणी करणे | | |
| | २३ | सुगंधी गवते कापणे व भट्टी पर्यंत वाहने | | |
| | २४ | भट्टी मध्ये सुगंधी गवत भरणे किवा खाली करणे | | |
| | २५ | नर्सरी मध्ये पिशव्या भरणे प्रति हजार | | |
| | २६ | नर्सरी मध्ये कलम/रोपे/बियाणे लावणे | | |
| | २७ | ब्रशकटरणे गवत/झुडपे कापणे (मशीन, इंधन व मजूरसह) | | |
| | २८ | चेनसा/ चेन कटरने झाडांची/फांध्यांची छाटणी करणे | | |
| ड) | | **अकुशल मजुर (हंगामी) करावयाची कामे** | | |
| | २९ | प्रयोग व शेतातील कामाकरिता कंत्राटी (पुरुष/स्त्री) दर प्रति दिवस | | |
| इ) | | **अकुशल मजुरांकडून (नियमित) करावयाची कामे** | | |
| | ३० | चौकीदारी कामाकरिता पुरुष रोजंदारी दर प्रति दिवस | | |
| फ) | | **कुशल मजुरांकडून करावयाची कामे** | | |
| | ३१ | कार्यालयीन/ प्रयोगशाळा कामाकरिता कुशल (पुरुष/स्त्री) रोजंदारी दर प्रति दिवस | | |

**नियम व अटी :-**

1. निविदा पत्रक कार्यालीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ६.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.
2. निविदा प्रमुख, नागार्जुन वनौषधी उद्यान डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांचे नावे देण्यात यावे.
3. कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावण्याची संपूर्ण जवाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील
4. बिलावर GST क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.
5. कंत्राटी मजुराचे वय १८ वर्षा पेक्षा कमी व ६० वर्षा पेक्षा जास्त असू नये.
6. कंत्राटदाराने शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या कृषी रोजंदार मजुरांचे धोरण पाळणे आवश्यक राहील.
7. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या मजुराने अनुचित प्रकार केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.सदर कंत्राटी मजुरांची जबाबदारी पुरवठादाराची राहील.
8. काही विपरीत घटना तथा विपरीत बाबी / प्रसंगी कंत्राट आपोआप संपूष्टात येईल.
9. मजुरांची कामाची वेळ हि आठ तास कार्यालयाने ठरवून दिल्या प्रमाणे राहील.
10. पुरवठाधारकाचे मजूर पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही. मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.
11. विभागावर देण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत तक्रार आल्यास किवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

12. कंत्राटदारास कामाच्या आवश्यकतेनुसार मजूर उपलब्ध करून द्यावे लागतील. तसेच विहित वेळेत मजूर उपलब्ध करून न दिल्यास करार रद्द करण्यात येऊन सदर कंत्राट दारास यापुढील निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

13. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकाने देयक सादर करतेवेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करतेवेळी देण्यात यावी.

14. कंत्राटदारासं संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारीत करण्यात येईल.

15. प्रक्षेत्रावरील विभागावर कामे तसेच बिजोत्पादनाचे कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्रि/पुरुष मजुरांना कामगार (लेबर कायदा) कायद्यानुसार किमान वेतन/ विमासंरक्षण/ भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पध्दतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे कराचा नियमाने व नियमित भरणा करणे इ. संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. संबंधित नियमित भरणा केल्याची पावती या कार्यालयास पुढील प्रत्येक देयाकापुर्वी सादर करणे आवश्यक राहील.

16. प्रक्षेत्रावरील कामे ही १२ महिन्यातील खरीप, रबी व उन्हाळी या तीनही हंगामाकरिता असून कामाचे दर ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध राहतील. तसेच विद्यापीठात काम केले म्हणून स्थायी बाबतचा दावा करता येणार नाही.

17. प्राप्त सीलबंद निविदा सोमवार दिनांक २९/०६/२०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वा. प्रमुख, नागार्जुन वनौषधी उद्यान, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचे दालनात उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी. तरी संबंधितांनी नियोजित वेळेस उपस्थित राहावे.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविदाधारकानीच नमूद कामाचे निविदा सादर करावेत.

15-6-2026

**प्रमुख,**
**नागार्जुन वनौषधी उद्यान**
**डॉ. पं दे कृ वि, अकोला**

प्रतिलिपी

१. **प्रभारी अधिकारी**, कृषि संशोधन माहिती प्रणाली, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांच्याकडे निविदा सूचना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यास्तव सादर.